**महाराष्ट्र राज्यात बांधण्यात येत असलेल्या हज हाऊसच्या व्यवस्थापना संदर्भात धोरण निश्चित करणेबाबत...**

**महाराष्ट्र शासन,**
**अल्पसंख्याक विकास विभाग,**
शासन निर्णय क्रमांक : हज २०१६/प्र.क्र.४८/२/कार्या-५,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३० जुलै, २०१६.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यातून प्रत्येक वर्षी सुमारे १२,००० यात्रेकरु हज यात्रेकरिता सऊदी अरेबिया येथे जातात. हज यात्रेवर जाणाऱ्या यात्रेकरुंच्या संख्येनुसार महाराष्ट्र राज्य हे देशातील ३ ऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. राज्यात मुंबई, नागपूर व औरंगाबाद ही तीन इम्बारकेशन पॉईंट्स असून या तीन ठिकाणाहून हज यात्रेकरिता सऊदी अरेबियाला जाणाऱ्या विमानांची उड्डाणे होतात. अशा प्रकारे ३ इम्बारकेशन पॉईंट्स असलेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. सद्य:स्थितीत अस्तित्वात/ बांधकामाधिन/प्रस्तावित असलेल्या राज्य शासनाच्या अखत्यारितील राज्यातील हज हाऊसेसचा तपशील पुढीलप्रमाणे आहे -

- **नागपूर :** नागपूर येथून हज यात्रेवर जाणाऱ्या हज यात्रेकरुंकरिता महाराष्ट्र शासनाने सन २००९-१० मध्ये भालदारपुरा, नागपूर येथे नागपूर हज हाऊस ची इमारत बांधलेली आहे.
- **औरंगाबाद :** औरंगाबाद येथून हज यात्रेवर जाणाऱ्या हज यात्रेकरुंकरिता रंगीन दरवाजा जवळ, औरंगाबाद येथे महाराष्ट्र शासनाकडून औरंगाबाद हज हाऊसच्या इमारतीचे बांधकाम सुरु आहे.

वर नमूद पार्श्वभुमीवर, नागपूर व औरंगाबाद येथील हज हाऊसेस च्या व्यवस्थापन/वापरासंदर्भात शासन निर्णय, अल्पसंख्यांक विकास विभाग, क्रमांक : हज २०१६/ प्र.क्र.४८/१/कार्या-५, दिनांक : २६ जुलै, २०१६ अन्वये धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. या धोरणानुसार हज हाऊस इमारतीतील तळ मजल्यावरील मोकळी जागा ( पार्किंग लॉट सह ) /कॉन्फरन्स हॉल/सभागृह/स्टेज/कक्ष इ. पुढील उध्दीष्टांकरिता भाड्यावर देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे -

१) खाजगी उद्दिष्ट वा लग्नकार्यासाठी भाडे आकारुन हज हाऊस च्या तळ मजल्यावरील मोकळी जागा(पार्किंग लॉट सह) /कॉन्फरन्स हॉल/सभागृह/स्टेज/कक्ष इ. भाड्यावर देता येईल. तथापि, लग्नकार्यासाठी तयार भोजन मागविण्यात यावे, हज हाऊस येथे भोजन बनविण्यास परवानगी देता येणार नाही.

२) इतर सामाजिक स्वरुपाच्या कार्यक्रमानिमित्त देखील भाडे आकारुन हज हाऊस च्या तळ मजल्यावरील मोकळी जागा (पार्किंग लॉट सह) /कॉन्फरन्स हॉल/सभागृह/स्टेज/कक्ष इ. भाड्यावर देता येईल.

३) खाजगी व्यक्ती वा संस्थांमार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या वाङ.मयीन, सामाजिक, शैक्षणिक स्वरुपाच्या कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता ठराविक अनामत रक्कम व भाड्याच्या रक्कमेचा आगाऊ भरणा केल्यानंतर हज हाऊस च्या तळ मजल्यावरील मोळी जागा ( पार्किंग लॉट सह ) /कॉन्फरन्स हॉल/सभागृह/स्टेज/कक्ष इ. भाड्यावर देता येतील.

वरील उद्दिष्टासाठी आकारण्यात यावयाचे भाडे दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

२. महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याक विकास विभागाच्या अखत्यारित असलेल्या हज हाऊसच्या तळ मजल्यावरील मोकळी जागा ( पार्किंग लॉट सह ) /कॉन्फरन्स हॉल/सभागृह/स्टेज/कक्ष इ. भाड्यावर देण्याकरिता पुढे नमूद केल्याप्रमाणे भाडे दराची आकारणी करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे -

**हज हाऊस इमारतीतील तळ मजल्यावरील मोकळी जागा ( पार्किंग लॉट सह ) / कॉन्फरन्स हॉल/सभागृह/स्टेज/कक्ष इ. भाड्यावर देताना आकारावयाचे भाडे दर :**

१) हज हाऊसच्या तळ मजल्यावरील मोकळ्या जागेत खाजगी उद्दिष्ट वा लग्नकार्यासाठी रु.२०,०००/- अधिक विद्युत आकारणी रु.५,०००/- असे एकूण रु. २५,०००/- प्रति दिन भाडे आकारुन तळ मजल्यावरील मोकळी जागा (पार्किंग लॉट सह) किंवा हॉल भाड्यावर देता येईल. तथापि, लग्नकार्यासाठी तयार भोजन मागविण्यात यावे, हज हाऊस येथे भोजन बनविण्यास परवानगी देता येणार नाही.

२) इतर सामाजिक स्वरुपाच्या कार्यक्रमानिमित्त खालीलप्रमाणे आकारणी करण्यात येईल -

- तळ मजल्यावरील मोकळ्या जागेसाठी रु.१२,०००/- विद्युत आकारणी रु.३,०००/- असे एकूण रु.१५,०००/-
- कक्षांच्या बाबतीत प्रत्येक दिवसाकरिता रु.२,५००/- अधिक विद्युत आकारणी रु.५००/- असे एकूण रु.३,०००/- प्रति कक्ष.
- सदरच्या रकमा डिमांड ड्राफ्ट किंवा ECS द्वारे "कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई" यांच्या नावे आगाऊ स्वरुपात प्रत्यक्ष वापराच्या निवास करण्याच्या दिनांकापुर्वी महाराष्ट्र राज्य हज समिती कार्यालय, मुंबईकडे पाठविणे आवश्यक राहील.

- महाराष्ट्र राज्य हज समिती कार्यालयाने सदर रकमेची पावती संबंधितांना द्यावी.
- सदर रकमेचा भरणा करण्यासाठी स्वतंत्र बॅक खाते उघडण्यात यावे.
- वर नमूद भाडे दरांचा महाराष्ट्र राज्य हज समितीने वेळोवेळी ( किमान २ वर्षातून एकदा ) आढावा घेऊन आवश्यकतेनुसार दरांचे नुतनीकरण करावे.

३) खाजगी व्यक्ती वा संस्थांमार्फत आयोजित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमांच्या आयोजनाकरिता ठराविक अनामत रक्कम व भाड्याच्या रक्कमेचा आगाऊ भरणा केल्यानंतर हज हाऊस मधील तळ मजल्यावरील मोकळी जागा(पार्किंग लॉट सह) /कॉन्फरन्स हॉल/सभागृह/स्टेज/कक्ष इ. भाड्यावर देता येतील.

४) हज हाऊसमध्ये कार्यक्रम आयोजित करण्यासाठी आयोजकाकडून या कामी आकारण्यात येणाऱ्या भाडयाच्या रकमेच्या २५% इतकी अनामत रक्कम घेण्यात यावी.

५) सदर उद्दिष्टाकरिता प्राप्त होणारे अनुदान व त्याचा प्रत्यक्ष खर्च याची कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई यांनी स्वतंत्र नोंदवही ठेवावी. हज हाऊसच्या भाड्यापोटी प्राप्त होणाऱ्या रकमांचा भरणा करण्यासाठी स्वतंत्र जमा खाते "Receipt Head" उघडण्यात यावे.

६) उपरोक्त खात्यांचे स्थानिक लेखा परिक्षकांकडून नियमित लेखा परिक्षण करुन घेण्याची जबाबदारी कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई यांची राहील.

३. हे आदेश तात्काळ प्रभावाने लागू होतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६०७३०१२३२५१९११४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Anees Iqbal Ismail Shaikh

Digitally signed by Anees Iqbal Ismail Shaikh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=447981acddcc5079f9c00eadfad2054d955a80a21de6164c4024daf5a9ea2c97, cn=Anees Iqbal Ismail Shaikh
Date: 2016.07.30 13:22:37 +05'30'

( अनिस शेख )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई,
३) प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

४) विभागीय महसूल आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर,

५) विभागीय महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद,

६) जिल्हाधिकारी, नागपूर,

७) जिल्हाधिकारी, औरंगाबाद,

८) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पानचक्की, औरंगाबाद,

९) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई,

१०) कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई,

११) खाजगी सचिव, मा.मंत्री (अ.वि.), मंत्रालय, मुंबई,

१२) खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री (अ.वि.), मंत्रालय, मुंबई,

१३) स्वीय सहायक, प्रधान सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१४) स्वीय सहायक, सह सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१५) स्वीय सहायक, उप सचिव (अ.वि.वि.), अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१६) सर्व अवर सचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१७) सर्व कक्ष अधिकारी, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१८) निवड नस्ती (का-५)/कार्यासन-५, संग्रहार्थ.